**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५७५/२००८**

**१) श्री डी.पी. धोटे,**
**कॅाम्पुटर सर्कल जवळ, राठी नगर,**
**अमरावती. ता.जि. अमरावती.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उविभागीय अधिकारी (महसुल)**
**जळगांव जामोद, ता. जळगांव जामोद, जि. बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**संग्रामपूर, ता. संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००७ (प्राप्त १७.४.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्र दाखल झालेले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार सर्कल पातूर्डा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज दाखल केल्याचे दिसून येते.

" **<u>आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल (वर्णन)</u>** : १) मौजे आवार, गट क्रं. २९ व ३० ही जमीन सास-यांना भूदानातून मिळालेली होती. त्यांचे दिनांक १७.१२.९१ ला निधन झाले तेव्हापासून म्हणजे ९१-९२ ते ०४-०५ पर्यंत म्हणजेच १४ वर्षे पर्यंत वारसाची नोंद कां घेण्यात आलेली नाही.

२) या काळात श्री रामा परिसे यांच्या नावाने फेरपत्रकात नोंद कोणत्या अधिकारात घेण्यात आली.

३) या प्रकरणी मा. उपविभागीय अधिकारी जळगांव जामोद यांनी त्यांचे १५.१२.०४ चे पारित केलेल्या आदेशान्वये आपणाला दु:खी ठेवण्यात आलेले आहे. त्याबाबत आपले स्पष्टीकरण देण्यात यावे.

४) फेर फार कलम अन्वये वरील आदेशाचे पालन न करता कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे वारसाची नोंद घेण्यात आली याचे स्पष्टीकरण.

५) ९१-९२ ते ०४-०५ पर्यंतचे वरिल दोन्ही शेताचे ७/१२ चे उतारे देण्यात यावे.

६) ०५-०६ या सालातील लाल्या पिकाच्या नुकसानीचे अनुदान दोन्ही शेताचे आद्याप मला मिळालेले नाही याचे कारण. "

परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ३.१.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी राजस्व महसुल जळगांव जामोद यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या माध्यमातून सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय उपलब्ध न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी तहसिलदार कार्यालय, संग्रामपूर यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" अर्जदार श्री डी.पी. धोटे (रमाबाई अहिर यांचे कुलमुख्त्यार रा. राठी नगर अमरावती) यांनी दिनांक ४.७.२००६ व दिनांक ६.७.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मौजा आवार ता. संग्रामपूर येथील गट क्रमांक २९, ३० व गट क्रं. ५७ मधील जमिनी बाबत ७/१२ उतारे फेर फार नोंदी, मालकी हक्काच्या नोंदीची माहिती मिळणे बाबत या कार्यालयाला अर्ज सादर केले होते. तसेच काही माहिती त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली होती. सदर माहिती ही गावस्तरावरील म्हणजे तलाठी आवार यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडून माहिती घेवून अर्जदारास द्यावयाची होती म्हणून तलाठी हयांचेकडून माहिती घेण्यात येवून दिनांक २.९.२००६ रोजी अर्जदारास समक्ष देण्यात आली असून त्याची पोच घेण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित माहिती दिनांक १२.१२.०६ रोजी या कार्यालयाचे पत्र क्रमांक कावि-प्र-२/७०१/०६, दिनांक १५.१२.२००६ अन्वये अर्जदारास पाठविण्यात आली आहे. त्याचे जावक नोंदवहीची छायाप्रत सोबत जोडली आहे. त्यानंतर अर्जदाराने पुन्हा माहिती मागितलेली नाही

किंवा मिळालेली माहिती पुर्ण आहे की अपूर्ण आहे या बाबत सुध्दा या कार्यालयास कळविलेले नाही. त्यामुळे अर्जदारास पुर्णतः माहिती मिळाली असल्याची या कार्यालयाची धारणा झाली होती. परंतु अर्जदाराने हीच माहिती मिळाली नाही असे नमूद करुन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ३.१.२००७ चे अर्जानुसार अपिल दाखल केले होते परंतु अर्जदाराने मागितलेली माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे त्यांचे प्रथम अपील दिनांक २८.२.२००७ रोजी निकाली काढण्यात आले आहे. अर्जदारास आवश्यक ती सर्व माहिती पुरविलेली असतांनाही त्यांनी हेतुपुरस्सर प्रथम व द्वितीय अपिल सादर केलेले आहे`. अर्जदार हयांना असे निरर्थक अर्ज करण्याची सवय असल्यामुळे त्यांनी आता पर्यंत २० ते २५ अर्ज सादर केले आहेत. प्रकरणांच्या प्रमाणित प्रति माहिती अधिकारात मागणी केलेल्या आहेत त्या पुरविण्यात न आल्याने अर्जदाराने चिडून जावून अपिल सादर केले आहे. सबब त्यांचा अपिल अर्ज खारिज करण्यात यावा, ही विनंती. "

अर्जदार श्री डी.पी. धोटे (श्रीमती रमाबाई अहिर यांचे कुलमुखत्यार), राठी नगर, अमरावती यांनी दिनांक ४.७.२००६ व दिनांक ६.७.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत मौजा आवार तालुका संग्रामपूर येथील गट क्रमांक २९ व ३० व गट क्रमांक २७ मधील जमीन बाबत ७/१२ चा उतारा फेरफार नोंद, मालकी हक्काच्या नोंदीची माहिती मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केला होता. तसेच काही माहिती त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली होती. सदर माहिती ही गावस्तरावरील म्हणजे तलाठी आवार यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घेवून अर्जदारास माहिती द्यावयाची होती. म्हणून तलाठी यांचेकडून माहिती घेण्यात येवून दिनांक २.९.२००६ रोजी अर्जदाराचे समक्ष देण्यात आली असून त्याची पोच घेण्यात आली आहे. तसेच उर्वरित माहिती दिनांक १२.१२.२००६ रोजी या कार्यालयाचे पत्र क्रमांक कावि/प्र-२/७०१/०६, दिनांक १५.१२.२००६ अन्वये अर्जदारास पाठविण्यात आली आहे. त्याच्या जावक नोंदीची छायांकित प्रत सुध्दा जोडलेली आहे. त्यानंतर अर्जदाराने पुन्हा माहिती मागितली नाही किंवा मिळालेली माहिती पुर्ण की अपूर्ण याबाबत सुध्दा या कार्यालयास कळविलेले नाही. त्यामुळे अर्जदारास पुर्णतः माहिती मिळालेली असल्याची या कार्यालयाची धारणा झाली होती. परंतु, अर्जदाराने सदरची माहिती मिळाली नाही असे नमूद

करुन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ३.१.२००७ च्या अर्जानुसार अपील दाखल केले होते. परंतु, अर्जदाराने मागितलेली माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे त्यांचे प्रथम अपील दिनांक २८.२.२००७ रोजी निकाली काढण्यात आले आहे. अर्जदारास आवश्यक ती माहिती पुरविली असतानाही त्यांनी हेतूपुरस्पर प्रथम व द्वितीय अपील सादर केले आहे. अर्जदार यांना असे अर्ज करण्याची सवय असल्यामुळे त्यांनी आतापर्यंत निरर्थक २०-२५ अर्ज सादर केले आहे. प्रकरणाच्या प्रमाणित प्रती माहितीच्या अधिकारात मागणी केलेल्या आहेत. त्या पुरविण्यात न आल्याने अर्जदाराने चिडून जावून अपील सादर केले आहे. सबब त्यांचा अपील अर्ज खारिज करण्यात यावा ही विनंती, असा खुलासा सादर केला आहे.

सदरच्या खुलाशा वरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही तलाठी यांचे स्तरावरील आहे. दिनांक ६.६.२००७ च्या अर्जामध्ये त्यांनी पटवारी सर्कल, पातूर्डा श्री अ.के. तायडे यास माहिती अधिकारी म्हणून नमूद केले आहे. परंतु, शाईने पुन्हा तहसिलदार सर्कल पारडी असे सुध्दा नमूद करुन सदरचा अर्ज तहसिलदार यांचेकडे सादर केलेला दिसतो. त्यावर अपीलकर्ता यांनी असा खुलासा केला आहे की, पटवारी यांनी अर्ज न घेतल्यामुळे व सर्व कागदपत्रे तहसिलदार यांचेकडे दिलेली असल्यामुळे सदरचा अर्ज हा तहसिलदार यांनी घेतला व त्यावर तसे नमूद केलेले आहे. परंतु, असे असले तरी उत्तरवादी यांच्या खुलाशावरुन माहिती मात्र ही ज्या पटवारी आवार यांचेकडून उपलब्ध करुन घेतलेली दिसते. त्यावरुन अपीलकर्ता यांनी अर्जदार म्हणून माहिती ज्या स्तरावर उपलब्ध असेल त्याच स्तरावर माहितीचा अर्ज करणे बंधनकारक आहे. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये कागदपत्रे त्यांना उपलब्ध झालेली आहे हे मात्र अपीलकर्ता यांनी मान्य केलेले आहे. त्याकरीता पुन्हा द्वितीय अपील कां दाखल केले असे विचारले असता त्यांनी अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भामध्ये त्यांना अजूनही माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. मुद्दा क्रमांक १ मध्ये त्यांनी १४ वर्षापर्यंत वारसाची नोंद कां घेण्यात आली नाही असा प्रश्न विचारलेला आहे. या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, टिपण्या, कागदपत्रे इ. माहिती उपलब्ध असते त्या माहितीच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन घेणे हे

अपेक्षित असते. कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रश्नांची उत्तरे ही अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी हे सार्वजनिक प्राधिकरणातील त्या त्या स्तरावरील उपलब्ध असलेल्या माहितीचे परिरक्षक असतात व त्यामुळे कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देणे एवढाच मर्यादित अर्थ माहितीच्या अधिकाराच्या तरतूदी प्रमाणे आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या बध्दल कोणत्याही प्रकारचे उत्तर हे जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध होऊ शकणार नाही. तसेच मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये " श्री रामा परीसे यांचे नांवाने पेरेपत्रकाची नोंद कोणत्या अधिकारात घेण्यात आली " या संदर्भात सुध्दा कोणत्या अधिकारात याबाबतची उत्तरे देता येणार नाही. परंतु त्या संदर्भामध्ये जर अर्ज कागदपत्रे उपलब्ध असतील तर त्याबध्दलची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात देता येणे शक्य होईल. व या संपुर्ण प्रकरणावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्या माहितीच्या आधारे महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ प्रमाणे सक्षम अधिका-याकडे तक्रार करुन त्यांना योग्य तो न्याय मिळवून घेता येईल व त्यामुळे अपीलकर्ता यांना जरी दिनांक ६.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नसेल तर ती त्यांना इतर अर्जाच्या माध्यमातून मिळाली असल्यामुळे व तसेच ती माहिती पुन्हा पुन्हा मागितल्यामुळे, माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे ती माहिती अधिका-याकडून ब-याच वेळा उपलब्ध होऊ शकत नाही व या प्रकरणातही तसेच झाल्याचे दिसून येते. माहिती अधिकारी यांनी खुलाशामध्ये म्हटले आहे की, अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज केले आहे. परंतु अशा प्रकारे एका अर्जातून त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अनेक अर्ज करुन कोणत्याही प्रकारे माहितीमध्ये बदल होऊ शकत नाही व त्यामुळे अशाप्रकारे अनेक अर्ज करुन सदरच्या माहिती अधिका-यास वेठीस धरुन प्रकरणात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती सुध्दा होऊ शकत नाही किंवा अर्जदाराच्या बाजूने कोणत्याही प्रकारचे आदेश निर्णय गुणवत्तेच्या बाबत होऊ शकत नाही. त्या करीता योग्य त्या कायद्याच्या प्रमाणे योग्य त्या सक्षम अधिका-याकडे तक्रार दाखल करुन न्याय मिळवून घेणे हा मार्ग असतो व त्याकरीता अनेक अर्ज दाखल करावयाची आवश्यकता नसते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल केला आहे व त्यात ते स्वतः प्रथम अपीलीय अधिकारी नाहीतच असे त्यांनी म्हटले आहे. अपीलकर्ता यांनी जर माहिती तहसिलदार सर्कल पातूर्डा असे म्हटले असेल तर तहसिलदार कार्यालयातील जी माहिती अधिकारी असतील तेच सक्षम अधिकारी असतात व त्यांचे वरिष्ठ अधिकारी तहसिलदार असतील तर ते प्रथम अपीलीय अधिकारी असतात. परंतु अपीलकर्ता हे ज्यांना अपीलीय अधिकारी म्हणून अपील दाखल करतात, त्यांनाच आयोगाकडून नोटीस काढल्या जाते. उपविभागीय अधिकारी यांचा खुलासा योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे सुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणामध्ये कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली असल्याुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**